११ OK

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय : मा. स्थायी समिती सभा दि. २२/१२/२०११ अजेंडाची मुळप्रत

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख : प्रकरण क्र - ८७ ते १०१

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय
दिनांक :- १६/१२/२०११.

## मा. स्थायी समिती सभा

सभा सूचना क्र. :- १९ दिनांक १६/१२/२०११

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. २२/१२/२०११ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १९, दि. १६/१२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

D\01 My Document\01 Nagar Sachiv\01 Vishay Patrika\02 Vishay Patrika - Standing 2007 - 2012\Vishay Patrika 2011-12.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १९, दि. १६/१२/२०११ सोबतची विषय पत्रिका**
**सभा गुरुवार दि. २२/१२/२०११**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ९७ | दि. १९/११/२०११ व ०१/१२/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** – निरंक |
| --- | **विनंती अर्ज** – निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** |
| ९८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी सि.आर.झेड. नकाशे तयार करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. |
| ९९ | निवीदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| १०० | मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग) |
| १०१ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

**दिनांक :- १६/१२/२०११.**

(सुरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १९, दि. १६/१२/२०११ सोबतची विषय पत्रिका**
**सभा गुरुवार दि. २२/१२/२०११**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत – निरंक** |
| ९७ | दि. १९/११/२०११ व ०१/१२/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** – निरंक |
| --- | **विनंती अर्ज** – निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव –** निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** |
| ९८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी सि.आर.झेड. नकाशे तयार करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. |
| ९९ | निवीदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| १०० | मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग) |
| १०१ | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

दिनांक :- १६/१२/२०११.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रोसेकड इर्ल
9/12/2011

# मा. विशेष स्थायी समिती सभा
# दि. १९/११/२०११
# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. १९/११/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शनिवार दिनांक १९/११/२०११ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. ११/११/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सायं. ५.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. उपनगर जिल्हाधिकारी, श्री. निर्मल देशमुख हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| २. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ३. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ४. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ५. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| ६. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ७. | श्री. शफिक अहमद सादत खान | सदस्य |
| ८. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| ९. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| १०. | श्री. मधुसुदन पुरोहित | सदस्य |
| ११. | श्रीम. नयना म्हात्रे | सदस्या |
| १२. | श्रीम. मर्लिन डिसा | सदस्या |
| १३. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | सदस्या |
| १४. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | सदस्य |
| १५. | श्रीम. नर्मदा वैती | सदस्या |
| १६. | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | सदस्य |

**गैरहजर सदस्य - निरंक**

**निर्मल देशमुख :-**

विशेष बैठकीसाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांचे मी स्वागत करतो आणि श्री. पाटील यांना सभा चालू करण्याची विनंती करतो.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शनिवार दि. १९/११/२०११ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात मा. विशेष स्थायी समिती सभा सुचना क्र. १६, दि. ११/११/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ८८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०११-१२ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत. सभापती स्थायी समिती पदाकरीता नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची तारीख १६/११/२०११ रोजी होती. त्यावेळी ३ उमेदवारांनी एकूण ४ नामनिर्देशन पत्र सादर केली. नामनिर्देशन पत्रे जरी ४ असली तरी उमेदवार तीनच आहेत. ते खालीलप्रमाणे. १) सौ. कल्पना महेश म्हात्रे २) श्री. बर्नड अ. डिमेलो, ३) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर. सदरची सर्व नामनिर्देशन पत्र पिठासीन अधिकारी यांस सादर करीत आहे.

**निर्मल देशमुख :-**

सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी केली आहे, ते तिन्ही नामनिर्देशन पत्र वैध आहे. सन्मा. सदस्या कल्पना महेश म्हात्रे, श्री. बर्नड अ. डिमेलो व श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर या तिन्ही उमेदवारांची नामनिर्देशन पत्र वैध आहेत. आपल्याला जर निवडणूक घ्यायची नसेल तर दोन उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र मागे घेतली पाहिजे. तर याच्यासाठी आपल्याला १५ मिनिटांचा वेळ देतो. ५.२० वाजेपर्यंत वेळ देतो. एकण ३ उमेदवार होते. त्यापैकी सन्मा. सदस्य बर्नड अ. डिमेलो यांनी उमेदवारी मागे घेतलेली आहे. आता दोन उमेदवार शिल्लक आहेत. सन्मा. कल्पना महेश म्हात्रे आणि शशिकांत जगन्नाथ भोईर. नगरसचिव निवडणूक प्रक्रिया कशी होईल ते आपण समजावून सांगा.

**नगरसचिव :-**

पिठासीन अधिकारी निवडणूक लढविण्यासाठी प्रत्येक उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे घोषीत करेल आणि हात वर करुन नामनिर्देशन मताची नोंद होईल ज्यांनी ज्या उमेदवारांच्या बाजून मत दिले अशा स्थायी समिती सदस्यांची नावे कार्यवृत्तांत नोंदवण्यात येतील. पिठासीन अधिकारी पुढील गोष्टींची खात्री करुन घेईल. मत देण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक सदस्यांना आपले मत देण्याची रास्त व वाजवी संधी देण्यात आली आहे. अशारितीने ज्याला मत दिले असेल त्या उमेदवारांच्या समोर नाव नोंदवण्यात येईल. ज्याचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा पालिका सदस्याला पुन्हा मत देण्याचे किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही. पिठासीन अधिकारी, ज्यांचे मतदान केलेले नाही अशा नावांची नोंद करेल. पिठासीन अधिकारी, ज्यांनी मतदान केले अथवा केले नाही अशा नावांची नोंद करेल. आणि निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवारांना प्राप्त झालेल्या मतांची संख्या घोषीत करेल. निवडणूक लढवल्यानंतर प्रत्येक मतदानाला मिळालेल्या मतांची संख्या घोषीत केल्यानंतर पिठासीन अधिकारी निकाल घोषीत करण्याची कारवाई करेल. तद्नंतर उमेदवारी मिळालेली मतांची संख्या चढत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करेल. ज्या उमेदवारांना सर्वात जास्त मते मिळतील ते रितसर निवडून आलेले घाषीत करतील. मते समसमान पडल्यास पिठासीन अधिकारी असे घोषीत करतील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असणारे पालिका सदस्य बहूसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल. ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध निवडून आला असल्याचे घोषीत करण्यात येईल. मुक्त निर्बंध निवडणूक पार पाडण्यासाठी पिठासीन अधिकारी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबाबत, कामकाजाची व्हिडीओ चित्रात नोंद देखील घेण्यात येईल. असे नियमात बदल आहे ते मी सगळ्यांना वाचून दाखवले आहे.

**निर्मल देशमुख :-**

आपण अल्फाबेटीक प्रमाणे मराठी नावाप्रमाणे, तर पहिले नाव सन्मा. कल्पना म्हात्रे यांचे येते. दसऱ्या क्रमांकावर सन्मा. शशिकांत ज. भोईर असे दोन उमेदवार आपल्याकडे आहेत. मी आपल्याला विनंती करतो, सन्मा. कल्पना महेश म्हात्रे यांना ज्या सन्मा. सदस्यांना मत द्यायचे त्यांनी कृपया हात वर करावे.

**उपसचिव :-**

ज्यांनी सन्मा. कल्पना महेश म्हात्रे यांना मतदान केले त्यांची नावे पुढील प्रमाणे. १) श्री. स्टीवन जॉन मेन्डोन्सा २) श्री. भगवती शर्मा ३) श्री. ओमप्रकाश अग्रवाल ४) सौ. कल्पना महेश म्हात्रे ५) श्री. मोहन म्हात्रे ६) श्री. बर्नड डिमेलो ७) श्रीम. नर्मदा वैती ८) श्री. मोहन जाधव.

**निर्मल देशमुख :-**

दुसरे उमेदवार आहेत, सन्मा. शशिकांत ज. भोईर यांना ज्या सन्मा. सदस्यांना मत द्यायचे त्यांनी कृपया हात वर करावे.

**उपसचिव :-**

सन्मा. शशिकांत ज. भोईर यांना ज्यांनी मतदान केले त्यांची नावे खालील प्रमाणे. १) श्री. शशिकांत भोईर २) लक्ष्मण जंगम ३) श्रीम. मर्लिन डिसा ४) श्री. एस. ए. खान ५) श्री. जुबेर इनामदार ६) श्री. अनिल सावंत ७) श्री. मधुसुदन पुरोहित ८) श्रीम. नयना म्हात्रे.

**निर्मल देशमुख :-**

इथे दोघांनाही आठ-आठ मते पडलेली आहे. सचिवांनी वाचून दाखवल्याप्रमाणे आपल्याला चिठ्ठी काढायची आहे. आपण कोणी पण सदस्य ठरवा कोणाच्या हस्ते चिठ्ठी काढायची. सर्वानुमते श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी चिठ्ठी काढावी याला एकमत आहे.

**भगवती शर्मा :-**

हो.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्या सौ. कल्पना महेश म्हात्रे यांच्या नावाची चिठ्ठी काढण्यात आली.

**निर्मल देशमुख :-**

सन्मा. सदस्या सौ. कल्पना महेश म्हात्रे यांचे आपल्या सर्वांतर्फे अभिनंदन करतो.

**नगरसचिव :-**

नवनिर्वाचित सभापती सौ. कल्पना महेश म्हात्रे यांना पिठासीन अधिकारी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करत आहेत.

**प्रकरण क्र. ८८ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०११-१२ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. ७७ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिमय १९४९ मधील प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये स्थायी समिती करिता ''सभापती'' पदावर नेमणुक करणेसाठी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत नामनिर्देशन

पत्र मागविली असता (१) श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो , (२) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर व ३) सौ. कल्पना महेश म्हात्रे ह्यांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली. नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता सर्व नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत. प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता (१) श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो ह्यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने एकुण दोन उमेदवार शिल्लक राहिले. ''सभापती'' पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने हात वर करुन मतदान घेतले असता (१) सौ. कल्पना महेश म्हात्रे ह्यांना ०८ इतकी मते मिळाली. व (२) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर ह्यांना ०८ इतकी मते मिळाली.

**सौ. कल्पना महेश म्हात्रे ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा
२) श्री. भगवती शर्मा
३) श्री. अग्रवाल ओमप्रकाश
४) श्रीम. कल्पना म्हात्रे
५) श्री. मोहन गोपाळ म्हात्रे
६) श्री. बर्नड डिमेलो
७) श्रीम. नर्मदा वैती
८) श्री. जाधव मोहन

**श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. शशिकांत भोईर
२) श्री. लक्ष्मण जंगम
३) श्रीम. मर्लिन डिसा
४) श्री. शफिक अहमद सादत खान
५) श्री. जुबेर इनामदार
६) श्री. अनिल दिवाकर सावंत
७) श्री. मधुसुदन पुरोहित
८) श्रीम. नयना म्हात्रे

**तटस्थ सदस्यांची नांवे -** निरंक

| | | |
|---|---|---|
| **मतदानावेळी एकूण हजर सदस्य** | :- | १६ |
| **सौ. कल्पना महेश म्हात्रे ह्यांच्या बाजूने** | :- | ०८ |
| **श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर** | :- | ०८ |
| **तटस्थ** | :- | ०० |
| **एकूण** | :- | १६ |

दोन्ही उमेदवारांना समसमान मते मिळाल्याने, दोन्ही उमेदवारांच्या नावाची चिट्ठी टाकण्यात आली. चिट्ठी काढण्यासाठी सर्वानुमते सन्मा सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांचे नांव सुचविण्यात आले. दोन चिट्ठीमधून जी चिट्ठी काढण्यात आली त्यावर श्रीम. कल्पना महेश म्हात्रे यांचे नाव असल्याने त्या निवडून आल्याच्या दिनांकापासुन मुदत संपेपर्यंत सभापती, स्थायी समिती या पदाकरिता मतदानाअंती काढलेल्या चिट्ठीद्वारे निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**निर्मल देशमुख :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ - सायं. ५.३० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मा. स्थायी समिती सभा

# दि. ०१/१२/२०११

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०१/१२/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०१/१२/२०११ रोजी सभा सुचना क्र. १७ दि. २४/११/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्रीम. कल्पना महेश म्हात्रे ह्या उपस्थित होत्या. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | सभापती |
| २. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ३. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ४. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ५. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| ७. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ८. | श्री. शफिक अहमद सादत खान | सदस्य |
| ९. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १०. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ११. | श्री. मधुसुदन पुरोहित | सदस्य |
| १२. | श्रीम. नयना म्हात्रे | सदस्या |
| १३. | श्रीम. मर्लिन डिसा | सदस्या |
| १४. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | सदस्य |
| १५. | श्रीम. नर्मदा वैती | सदस्या |
| १६. | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य - निरंक</u>**

**मा. सभापती :-**

आज स्थायी समितीची पहिल्या मिटींगमध्ये तुम्ही सगळे हजर झाले. त्याबद्दल मी सर्व सदस्यांचे आभार मानते आणि महिला सभापती म्हणून मला जो आज मान मिळाला आहे त्याबद्दल मी सर्व पक्षांचे आभार मानते. मला माझ्या कार्यकाळात तुम्ही सर्व सहकार्य कराल आणि माझा कार्यकाल आनंदाने पूर्ण होईल अशी मी आशा बाळगते. आणि सर्व सदस्यांचे पून्हा एकदा आभार मानून सचिव साहेबांनी कामकाजाला सुरुवात करावी अशी मी विनंती करते.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. ०१/१२/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १७, दि. २४/११/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र.८९, दि. ०४/०८/२०११, दि. १६/०८/२०११, दि. ३०/०८/२०११, १३/०९/२०११, २१/०९/२०११ व ३०/०९/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**शशिकांत भोईर :-**

एक मिनिट सचिव साहेब, इतिवृत्तांतामध्ये काही ठराव झालेले आहेत त्याची पूर्तता काय झाली? तर मा. सभापती मॅडम आपण आम्हाला याच्यावर चर्चा करण्यासाठी वेळ द्यावा.

**मा. सभापती :-**

इतिवृत्तांत होऊ दे नंतर चर्चा करा.

**शशिकांत भोईर :-**

इतिवृत्तांत होऊ द्या म्हणून तुम्हाला सांगितले १ ते ५ इतिवृत्तांत आहे. एकदम होतील तर चर्चा करायला मिळणार नाही कारण आम्ही बरेच ठराव केलेले त्याच्यावर आम्हाला चर्चा करायची आहे.

**मा. सभापती :-**

पहिले इतिवृत्तांत कायम करा नंतर चर्चा करा.

**भगवती शर्मा :-**

दि. ०४/०८/२०११, दि. १६/०८/२०११, दि. ३०/०८/२०११, १३/०९/२०११, २१/०९/२०११ व ३०/०९/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, आमचे याच्यामध्ये करेक्शन आहे ते आम्ही तुम्हाला देतो.

**नगरसचिव :-**

ठिक आहे.

**प्रकरण क्र. ८९ :-**

दि. ०४/०८/२०११, दि. १६/०८/२०११, दि. ३०/०८/२०११, १३/०९/२०११, २१/०९/२०११ व ३०/०९/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७८ :-**

दि. ०४/०८/२०११, दि. १६/०८/२०११, दि. ३०/०८/२०११, १३/०९/२०११, २१/०९/२०११ व ३०/०९/२०११ रोजींच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.९०, प्रादेशिक परिवहन विभागास मिरा भाईंदर येथे अटकावून ठेवलेली वाहने ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत आरक्षण क्र. ३२६ ट्रक टर्मिनलच्या जागेत आर.टी.ओ. कॅम्प करिता कार्यालय बांधून भाड्याने जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी कार्यालयासमोर असलेल्या जागेत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कायदेशीर कारवाई केलेल्या रिक्षा बंद करून व अटकावून ठेवण्याकरिता तीन एकर जागेची मागणी केली आहे. एम.आय.डी.सी. येथे उपलब्ध करून दिल्या ठिकाणी रिकामी जागा नाही. तथापी प्रादेशिक परिवहन विभाग व इतर शासकिय विभाग यांनी त्यांना भाड्याने दिलेल्या जागेचे भाडे महानगरपालिकेकडे जमा केलेले नाही. प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे यांचेकडे घोडबंदर कार्यालयाचे रू.१,४२,८३५/- भाड्याची थकबाकी आहे. त्यामुळे सदर विभागास जागा भाड्याने देण्यात येऊ नये.

**भगवती शर्मा :-**

मेरा अनुमोदन है।

**शशिकांत भोईर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत आरक्षण क्र. ३२६ ट्रक टर्मिनल ही जागा अवजड वाहने थांबविण्यासाठी एकमेव जागा आहे. सदर आरक्षणाची जागा पुर्णतः महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेली नाही. मिरा भाईंदर शहरात अनेक इंडस्ट्रीज आहेत. त्यांना कच्या/पक्का माल घेऊन आलेली अवडजड वाहने रहदारीच्या वेळी शहरात येऊ नये तसेच अनेक मालवाहु ट्रक बसेस रस्त्यावर इत्यादी ठिकाणी उभी न राहण्यासाठी ट्रक टर्मिनल आरक्षण करण्यात आले आहे. त्यामधुन काही जागेत आर.टी.ओ. कॅम्प करीता कार्यालय बांधून भाड्याने जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

भाईंदर (पूर्व), पश्चिम जोडणारा उड्डाण पुलाखाली पुर्वेकडील जागेत अवजड वाहने उभी राहत असल्यामुळे परिसरातील रहिवाशांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्यामुळे सदर जागेतील पे ॲन्ड पार्क जागेसाठी काढण्यात आलेले टेंडर रद्द करून जागा मोकळी करण्यासाठी मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०८/२०११ रोजी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची 'ड' प्रकरण २ नियम १ पोटनियम के नुसार प्रस्ताव घेऊन पे ॲन्ड पार्कची जागा मोकळी करावी ह्याबाबत ठराव करण्यात आला आहे. तसेच आरक्षण क्र. ३२६ मध्ये बी.एस.यु.पी. योनजेअंतर्गत झोपडपट्टीतील रहिवाशांना तात्पुरत्या राहण्याची सोयी

करण्यासाठी ट्रान्झीट कॅम्पचे बांधकाम सुरू करण्यात आले आहे. अगर आर.टी.ओ. कॅम्पच्या कार्यालयासमोरील जागेत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रतील कायदेशीर कारवाई केलेल्या रिक्षा बंद करून व आटकवून ठेवण्याकरिता तीन एकर जागा दिल्यास ट्रक टर्मिनलची जागा कमी होईल. शहरात येणारी अवजड वाहने मालवाहू ट्रक, बसेस इत्यादी उभी करण्यासाठी जागा उपलब्ध नसेल त्यामुळे दररोज रहदारीला अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी होईल.

प्रादेशिक वाहन विभागास मौजे पाली, उत्तन जुना स.क्र. ६५, नविन स.क्र. २५ ह्या जागेतील तीन एकर जमिन तात्पुरत्या स्वरूपात देण्यात यावी, असा मी ठराव मांडत आहे.

**एस.ए. खान :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र.९० साठी दोन ठराव आलेले आहेत तर सचिव साहेब ठराव मतदानाला टाका.

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब, ब्रिजच्या खाली आमचे स्थाय समितींची सदस्या मुसर्रत बानो यांनी ठराव मांडला होता, स्थायी समिती मध्ये ब्रिज खाली ट्रक जे उभे राहतात, गाड्या उभे करतात त्याला तिथुन स्थलांतर करायच्या होत्या. त्याचे काय झाले? पे अँन्ड पार्क चा २००८ चा होता पण तो सहा महिन्याकरीता होता.

**संभाजी पानपट्टे सो. (मा. उपायुक्त) :-**

माहिती घेतो.

**एस.ए. खान :-**

उपायुक्त साहेब माहिती काय घेता तो ठेका रद्द करण्यात आलेला आहे स्थायी समितीच्या सभेमध्ये ते रद्द करण्यात आलेलं आहे. तिकडच्या नागरीकांना त्रास होतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण ९० करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक ओमप्रकाश अग्रवाल दुसऱ्या ठरावाचे सुचक शशिकांत भोईर. तर मी दुसरा ठराव मतदानाला टाकतो. सुचक शशिकांत भोईर अनुमोदन एस.ए. खान या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे. पहिला ठराव मतदानाला टाकतो. सुचक ओमप्रकाश अग्रवाल, अनुमोदक भगवती शर्मा या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे दोन्ही मतदान झालेले आहे दोन्ही ठरावाला समान मतदान झालेली आहे. दोन्ही ठरावाला ७-७ मतदान झालेली आहे. तर कायद्याच्या तरतुदीनूसार टाय झाल्यानंतर सभापतींना कास्टींग वोट आहे. दोन्ही ठरावाला मतदान सेम झालेले आहे. तर आपले निर्णायक मत जाहीर करावे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडीया यांनी जो ठराव मांडला त्याबाजूने मी मतदान करतो.

**नगरसचिव :-**

म्हणजे ओमप्रकाश गारोडीया यांच्या ठरावाला कास्टींग मत पडलेले आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांचा ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९० :-**

प्रादेशिक परिवहन विभागास मिरा भाईंदर येथे अटकावून ठेवलेली वाहने ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेणे.

**ठराव क्र. ७९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत आरक्षण क्र. ३२६ ट्रक टर्मिनलच्या जागेत आर.टी.ओ. कॅम्प करिता कार्यालय बांधून भाड्याने जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी कार्यालयासमोर असलेल्या जागेत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कायदेशीर कारवाई केलेल्या रिक्षा बंद करून व अटकावून ठेवण्याकरिता तीन एकर जागेची मागणी केली आहे. एम.आय.डी.सी. येथे उपलब्ध करून दिल्या ठिकाणी रिकामी जागा नाही. तथापी प्रादेशिक परिवहन विभाग व इतर शासकिय विभाग यांनी त्यांना भाड्याने दिलेल्या जागेचे भाडे महानगरपालिकेकडे जमा केलेले नाही. प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे यांचेकडे घोडबंदर कार्यालयाचे रू. १,४२,८३५/- भाड्याची थकबाकी आहे. त्यामुळे सदर विभागास जागा भाड्याने देण्यात येऊ नये.

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल** **अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | १) श्री. शशिकांत भोईर | निरंक |
| २) श्री. ओमप्रकाश गंगाधरजी अग्रवाल | २) श्री. जुबेर इनामदार | |
| ३) श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा | ३) श्री. एस. ए. खान | |

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| ४) श्री. भगवती शर्मा | ४) श्री. अनिल सावंत | |
| ५) श्रीम. नर्मदा वैती | ५) श्री. लक्ष्मण जंगम | |
| ६) श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | ६) श्रीम. मर्लिन डिसा | |
| ७) श्री. मोहन जाधव | ७) श्री. पुरोहित मधुसुदन | |
| ८) श्रीम. कल्पना महेश म्हात्रे (सभापती) - कास्टींग वोट | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब, शहरामध्ये जेवढ्या गाड्या उभ्या राहतात यांना टोईंग करुन कुठे ठेवायची व्यवस्था नाही मग ते केलं नाही पाहिजे असं तुमचं म्हणणं आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश गारोडीया यांनी जो ठराव मांडलेला आहे त्या ठरावाला ८ मत पडलेली आहे. शशिकांत भोईर यांनी मांडलेल्या ठरावाला ७ मत पडलेली आहे. तर ओमप्रकाश गारोडीया यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती महोदय, ठराव झालेला आहे. बी.एस.यु.पी. चे कोणी अधिकारी इथे आलेले आहेत का? बी.एस.यु.पी. स्कीम आपण इम्प्लीमेंट करणार आहोत. त्याच्यासाठी ट्रांन्झीट कॅम्प उभारणार आहोत ती जागा आपण कुठे देणार आहोत.

**दिपक खांबित :-**

ह्याच जागेमध्ये देणार आहोत.

**अनिल सावंत :-**

ह्याच जागेमध्ये ट्रांन्झीट कॅम्प ची जागा देणार आहोत आणि सध्या ट्रक टर्मिनलसाठी ते आरक्षण रीझर्व्ह आहे आणि आता आपण त्याचा युज चेंज करणार आहोत. मग त्याच्यासाठी ३७ नियम खाली मायनर मोडीफिकेशनची गरज नाही का?

**दिपक खांबित :-**

केलेलं आहे ते फायनल स्टेज ला आहे.

**अनिल सावंत :-**

काय ते?

**दिपक खांबित :-**

३७ ची प्रोसेस.

**अनिल सावंत :-**

आता जो सभागृहामध्ये ठराव झालेला आहे त्याचा युज आपण चेंज करत आहोत. टोईंग च्या गाड्या पार्किंगसाठी जागा आपण आर.टी.ओ. ला देणार आहोत.

**दिपक खांबित :-**

आमचा प्रस्ताव असा होता की, आर.टी.ओ. च्या मिरा भाईंदरमध्ये ज्या रिक्षा आहेत त्या उचलण्याची एक मोहिम घेणार होती त्याला फक्त १५ दिवसांकरीता जागा पाहिजे होती.

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये १५ दिवसांत सदर जागा हद्दीत आहे ती खाली होणार आहे आणि हे आपण त्यांना परमनंट देत आहोत.

**दिपक खांबित :-**

नाही एम.आय.डी.सी. ला जागा उपलब्ध नाही असं आम्ही म्हटलेलं आहे.

**अनिल सावंत :-**

बरोबर आहे आता जो ठराव झाला ट्रक टर्मिनेसची जी जागा देणार आहोत ती आपण परमनंट देणार आहोत.

**दिपक खांबित :-**

साहेब नाही.

**अनिल सावंत :-**

मग, किती दिवसासाठी देणार आहोत? १५ दिवसासाठी देणार का?

**दिपक खांबित :-**

त्यांच्या कॅम्प पुरती फक्त ते मिरा भाईंदरमध्ये मोठा कॅम्प घेणार आहे त्याकरीता त्यांना १५ दिवसासाठी देणार आहे.

**अनिल सावंत :-**

तसं ठरावामध्ये आहे का? १५ दिवसासाठी आपण देत आहोत.

**दिपक खांबित :-**

ठराव तर असा केला आहे की द्यायचं नाही.

**अनिल सावंत :-**

त्यांनी इतर कुठे सुचवलेलं नाही आहे ना ठरावामध्ये इतर कुठे जागा सुचवली आहे का?

**दिपक खांबित :-**

शेवटी त्यांनाच कारवाईची मागणी करतो ना.

**जुबेर इनामदार :-**

कारवाईची मागणी आपण टोईंग गाड्या करतो त्यांनाच ठेवायला जागा पाहिजे ना.

**अनिल सावंत :-**

त्यांनी कुठे जागा सुचवली आहे का? शहरामध्ये जागा देणं गरजेचं आहे. ठराव जो झाला त्याच्यामध्ये जागा सुचवली आहे का?

**जुबेर इनामदार :-**

एका साईडने जिथे जागा ठेवत होते ते आपण बंद करतो त्यांना तिथे द्यायचं नाही असं आपण आता ठराव केला ना.

**दिपक खांबित :-**

साहेब, ॲक्चुअली जिकडे टोईंग मध्ये गाड्या पकडुन ठेवतात ती जागा आपली नाहीच आहे. ती ई.एस.आय. ची जागा आहे. आपण खुपवेळा फॉलोअप केलं. पण ते काही आलेलं नाही म्हणून त्यांना सांगितलं की तात्पुरती ठेवा कारण त्या लोकांनी पत्र दिलं की, आम्हाला ही जागा खाली करुन त्या कारण आम्हाला ई.एस.आय.चं हॉस्पीटल बांधायचं आहे. त्यांची ती जागा रीझर्व्ह आहे. त्यांनी खाली करायचं पत्र दिलेलं आहे.

**अनिल सावंत :-**

आता जो ठराव झाला त्याच्यामध्ये कुठे उल्लेख नाही की, जागा कुठे द्यावी म्हणून

**दिपक खांबित :-**

नाही.

**अनिल सावंत :-**

मग आम्ही आमच्या ठरावामध्ये उल्लेख केलेला आहे बघुन घ्या जागा अवेलेबल होत असेल तिथे जागा आहे जागा चांगली अवेलेबल आहे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे मी त्याच्यावर विचार करते.

**एस.ए. खान :-**

मा. सभापती मॅडम, उड्डानपुलाच्या खाली पार्किंगचा ठेका रद्द करण्यात आलेला आहे आणि उड्डाणपुलाच्या तिथे टेम्पो उभे राहतात स्टँडीगमध्ये किती वेळा विषय झाला तरी त्याच्यावर कारवाई होत नाही. अधिकारी कारवाई का करत नाही? मेन रोडवर टेम्पो उभे करतात किती वेळा सांगायचं?

**जुबेर इनामदार :-**

तिथे पूर्णपणे रहिवाशी क्षेत्र आहे त्या पार्किंगचा फायदा घेऊन बरंच काही तिथे उद्योग होत असतात.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती मॅडम, त्या ब्रिजच्या खाली गाड्या ठेवायचं बंद करा असा ठराव केल्यानंतर काय केलं? ते सांगा. अधिकाऱ्यांना सांगुन द्या की, काय कारण आहे म्हणून तुम्ही ठराव केल्यानंतर त्याच्यावर कारवाई झाली नाही त्याच ठिकाणी गाड्या उभे राहतात त्याचं काय कारण आहे तेवढं सांगा.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती मॅडम, सुभाषचंद्र मैदानाच्या बाजूला किती कचऱ्याच्या ट्रक उभे असतात, शाळेच्या बस उभे असतात तिकडच्या गाड्या का काढत नाही? येणारी जाणारी वाहने किती आहेत? तिकडे मुले वगैरे फिरतात. गाड्या येणाऱ्या जाणाऱ्या फास्ट असतात एखाद्या मुलाचं एक्सीडंट झालं त्याला तिकडे कोण जबाबदार आहे? कारण तिकडे फार शाळेच्या बसेस असतात कचऱ्याचे ट्रक एवढे असतात की हिसाबाच्या बाहेर त्याच्यावर आपली महापालिका का कारवाई करत नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगी ने बोलतो प्रत्येक ठिकाणी जागेचा प्रॉब्लेम आहे. आज तोच विषय होता ठेवायला जागा नाही.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, तुमचं म्हणणं बरोबर आहे की जागा नाही म्हणून पण आपल्या महापालिकेने त्या गाड्या पकडलेल्या नाही. कोणीतरी ड्रायव्हर येऊन तिकडे गाडी उभे करतात एखादा माणूस एवढं मोठं वाहन विकत घेतो तर त्यांना गाडी ठेवायची जबाबदारी त्यांची आहे. आपली नाही. कुठेही गाड्या उभ्या करणे याचा अर्थ काय आहे? त्यांची जबाबदारी आहे. गाडी मालकाची जबाबदारी आहे. आपल्या महापालिकेने पकडून आणलेल्या गाड्या नाही आहेत. शाळेची बस एखादा ड्रायव्हर कुठेही उभी करतो, जागा भेटते म्हणून. त्याचा काय अर्थ आहे?

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती मॅडम, यांना एक सांगु द्या बाकी सर्व ठिकाणी गाड्या उभ्या असतात. ते काय करायचे ते करा. सगळ्या सदस्यांचे जसे म्हणणे असेल, कोणाची तक्रार असेल त्या पध्दतीने कारवाई करा. ब्रिजच्या खाली जे पार्कींगमध्ये ट्रक वगैरे लावतात त्याचा ठराव करुन काय केले? ठराव झाल्यानंतर का कारवाई झाली नाही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या संदर्भित अधिकारी श्री. नरेंद्र चव्हाण आहेत ते आज आले नाहीत. ठराव झाला ते मान्य आहे. टिपणी सादर केली, आयुक्तांकडे पुट-अप केले आहे. आयुक्तांची मंजुरी मिळाल्यानंतर तत्काळ कारवाई करण्यात येईल. कुठले टेंडर टर्मिनेट करण्यापूर्वी त्याला नोटीस द्यावी लागते. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. अंतिम मंजुरीसाठी साहेबांकडे आहे. साहेबांची मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ कारवाई करण्यात येईल.

**एस. ए. खान :-**

पानपट्टे साहेब, तो ठेका संपलेला होता. तुम्ही ठेका काय रद्द करणार?

**जुबेर इनामदार :-**

तुमच्याकडे माहिती असेल तर ती मागवून घ्या ना.

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, पुढचा विषय घेण्यात यावा.

**नयना म्हात्रे :-**

मी आता सांगितले की, सुभाषचंद्र मैदानाच्या बाजूला बसेस वगैरे असतात, त्याचे काय झाले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या संदर्भात पुढच्या वेळेला वाहतुक पोलीसांना बोलावून घेऊ.

**शशिकांत भोईर :-**

अद्याप पर्यंत ट्राफीकवाले बोलावले नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पुढच्या वेळेला बोलावतो.

**शशिकांत भोईर :-**

गेल्या वेळेला ठेका मंजुर केलेला होता ना. त्याच्यामध्येच बोललेले आहे की, अद्यापपर्यंत ट्राफीकवाले आले नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

पानपट्टे साहेब या सभेमध्ये आपण ठराव करतो, निर्णय घेतो त्याची टिपणी ६-६ महिन्यापर्यंत होणार असेल तर ठराव करुन काय उपयोग? कमिशनर साहेबांनी अजूनपर्यंत टिपणी का केली नाही? प्रत्येक मिटींगला तोच विषय येतो आणि ४-४, ६-६ महिने काही कारवाई झाली नाही तर काय उपयोग आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पुढच्या वेळेला कारवाई करुन घेतो.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती मॅडम, आमची आपल्याला मागणी आहे की, तशी प्रशासनाला सुचना करावी. सदस्यांनी केलेली मागणी शहराच्या हितासाठी असतात.

**मा. सभापती :-**

मागील ठरावाचे जे काही निर्णय झाले त्याच्यावर प्रशासनाने कारवाई करण्यात यावी आणि वाहतुक अधिकाऱ्यांना बोलावून त्यावर कारवाई करण्यात यावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्या वेळी फार चर्चा झालेली आहे. परिवहन ठेक्याबद्दल पण विषय झालेला आहे. तर माझी पण सभापती महोदयांना विनंती आहे. आज जे-जे विषयपत्रिकेवर निर्णय होतील किंवा अन्य काही गोष्टी या चर्चेमध्ये होणार आहे. त्याबाबतीमध्ये अधिकाऱ्यांनी पुढच्या मिटींगमध्ये अनुपालन अहवाल घेऊन यावे असे तुम्ही आदेश द्यावे अशी आमची विनंती आहे.

**मा. सभापती :-**

अनुपालन पुढच्या सभेत देवून प्रत्येक विभागांना अनुपालन पुढच्या सभेत द्यावे आणि जो काही आदेश झाला असेल, कारवाई झाली असेल त्याची माहिती प्रत्येक सभेत देण्यात यावी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९१, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती महोदया, आपले नविन कमिशनर साहेब आल्यानंतर त्यांनी एक चांगला पायंडा टेंडरच्या बाबतीत ई-टेंडरींग करुन छोटी-छोटी जरी अमाऊंट असेल तरी कॉम्पेटीशन करुन पालिकेचे हित बघितले. पी.डब्लू.डी. सुध्दा त्याला चांगली साथ देऊन अशाप्रकारे कामे चालु आहेत. मग, आता आज जी स्थायी समितीची अनुमती घेतात, ते सर्व टेंडर न करता सोसायट्यांना जवळ जवळ १५-१५ लाखाची कामे दिलेली आहेत. त्याचे कारण काय? २-३ लाखाचे आपण ई-टेंडरींग करतो, कॉम्पेटीशन करतो. मग आज जे स्टॅन्डीग कमिटीची मान्यता घेतात, उद्या हेच पत्रकार किंवा इतर स्थायी समितीला दोष देणार आहेत की, स्थायी समितीने मंजूरी दिली, मग ई-टेंडरींग न करता, कॉम्पीटीशन न करता सोसायट्यांना त्यांनी का दिले?

**मा. सभापती :-**

प्रशासनाने त्याचा खुलासा करावा.

**दिपक खांबित :-**

साहेब, आयुक्त आल्यानंतर दि. ३०/०९/२०११ पर्यंत आपण काही काम सोसायट्यांना दिली. त्यानंतर आम्हाला तोंडी आदेश दिले की, आपल्याकडे टेंडर यायला लागते. त्याच्यामुळे बिल यायला लागली. कॉम्पीटीशन व्हायला लागली. तुम्ही याच्यापुढे सगळी काम ई-टेंडरींग करा. दि. ३०/०९/२०११ नंतर एकसुध्दा ई-टेंडरींग केले नाही. पण कसे आहे की, शासनाचा जी.आर. आहे की, जेवढी १५ लाखापर्यंतची कामे असतात त्याच्यातून ३३ टक्के कामे ही जिल्हा मंजुर सोसायट्यांना द्या. ३३ टक्के कामे ही सुशिक्षीत बेरोजगार द्या आणि ३४ टक्के कामांचे टेंडरींग करा. बाकी १५ लाखाच्या वरती जी कामे आहेत त्याचे १०० टक्के टेंडरींग करा. त्याप्रमाणे आम्ही कारवाई करायचो. आयुक्त साहेबांनी आदेश दिल्यामुळे आम्ही दि. ३०/०९/२०११ नंतर प्रत्येक कामाचे ई-टेंडरींगने टेंडर काढलेले आहे.

**अनिल सावंत :-**

आता तुम्ही याच्यापुढे काय कार्यपध्दती अवलंबवणार आहात? म्हणजे सोसायट्यांना देणार आहात की टोटल कॉम्पेटीशन करणार आहात.

**दिपक खाबित :-**

साहेब, आता एका प्रभाग समितीने ठराव केला त्यावर ठरावाची प्रत आज आली की लगेच मा. आयुक्त साहेबांची मान्यता घेऊन जसे बोलतील तसे काम सुरु करु.

**अनिल सावंत :-**

म्हणजे ३३ टक्केचे रिझर्व्हेशन आहे. सोसायट्यांना किंवा सुशिक्षीत बेराजगारांना, त्याप्रमाणे पुढील कारवाई करणार आहेत.

**दिपक खांबित :-**

आता आयुक्त साहेबांच्या मान्यतेने आम्ही तशी शिफारस करणार की, हा ठराव झाला आहे या प्रमाणे करायला पाहिजे म्हणून.

**अनिल सावंत :-**

शासनाचा जी.आर. आहे त्याप्रमाणे कमिशनर साहेबांनी आपल्या अधिकारामध्ये कुठचीही कामे सॅग्शन केल्यानंतर स्थायी समितीमध्ये किती दिवसात यायला पाहिजे. बी.पी.एम.सी. ॲक्टप्रमाणे.

**दिपक खांबित :-**

१५ दिवसामध्ये.

**मर्लिन डिसा :-**

मा. सभापती मॅडम, मला एक विचारायचे आहे. मिरारोडला स्वर्गीय लालबहाद्दुर शास्त्री मार्ग एम.टी.एन.एल. रोड तिथे काम चालु आहे. नागरीक असे म्हणत आहेत की ते आमदार फंडाने होत आहे. तर जरा खुलासा करावा की, पालिकेने खर्च केलेला आहे की, आमदार फंडातुन पैसे आलेले आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती महोदय, जैसे सन्मा. सदस्या मर्लिन डिसा मॅडमने कहॉ की, ऐसा कहा जा रहा है की, आमदार फंड से ऐसी चर्चा इन्होने सुनी होगी। जबतक मुझे जानकारी मिली है उसमे मुझे यह जानकारी मिली है की आमदार साहबने उस रस्ते को बनानेके लिए इस प्रशासन से बार बार निवेदन करके कारवाई करने के लिए............

**(सभागृहात गोंधळ)**

**मर्लिन डिसा :-**

आप बताईए लेकीन मै प्रशासनसे जानना चाहती हूँ।

**दिपक खांबित :-**

सदरचे काम हे आपण मागील दोन महिन्या पूर्वीच्या स्टॅन्डीगमध्ये पूर्ण करुन घेतले आणि आपला जो बजेट आहे त्याच्यामध्ये नविन रस्ते हेड आहे त्याच्यामधून घेतलेला आहे. त्याकरीता आमदार-खासदार किंवा नगरसेवक कुठलाही निधी कोणी उपलब्ध करुन दिलेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

खांबित साहेब, जरा खुलासा करा मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फुटपाथ वरील लाद्या इत्यादी दुरुस्ती करणे. कोणता एरिया आहे ते दिला नाही. मिरा भाईंदर क्षेत्र मोठे आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, याच्यामध्ये मेजर जे काम आहे ते नवघर रोड, बी.पी. रोड आणि गोडदेव फाटक रोड या राडचे निघालेले आहे आणि डिवायडर जे आहे त्याची कनकियाची मागणी आहे. बरेचसे सिल्व्हर पार्क रस्ता, मिरारोडला शांतीनगरचा रस्ता याचे जे डिव्हायडर आहे हे बरेच ठिकाणी तुटले फुटलेले आहेत. ते खराब दिसतात. ही सगळी कामे त्याच्यामधून करुन घ्यायची आहेत. ही टोटल जनरल कामे आहेत. डिवायडर आणि फुटपाथवरच्या लाद्या निघालेल्या आहेत ना ते बसवायचे काम आहे.

**शशिकांत भोईर :-**

करायला घ्या ना.

**दिपक खांबित :-**

करायला घेतलेले आहे. कमिशनर साहेबांच्या बंगल्याच्या तिकडचे झाले आहे. आता उद्यापासून सिल्व्हर पार्कचे सुरु करतो.

**मा. सभापती :-**

अवलोकन मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ९१ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ८० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नांव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | काशीगांव प्रभाग क्र. ७५ मधील मिनाक्षी नगर पासून माशाचापाडाकडे जाणारा अतिशय खराब झालेला रस्ता तयार करणे. | रू. १४,९९,३००/- | मे. आंबिवलीरास मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| २ | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र. २२१ पासून मुनीस क्लासिक पर्यत रस्ता तयार करणे. | रू. ९,०६,७००/- | मे. मोरया मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. कल्याण, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील सिल्व्हर पार्क सिग्नल जवळील रस्त्याचे पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू. ९,९६,८००/- | मे. कल्याणी मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ४ | भाईंदर (प) प्रभाग क्र. ३१ येथील अंतर्गत सी.सी. रस्ते दुरूस्ती करून पेव्हर ब्लॉक बसविणे. | रू. ९,९९,०००/- | मे. प्रगती आदि मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फुटपाथ वरील लाद्या कर्बस्टोन इ. दुरूस्ती करणे. | रू. ९,९५,०००/- | मे. शिरगांव मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ६ | भाईंदर (प) प्रभाग क्र. २३ मधील मैना मेन्शन अपार्ट ते शुभलक्ष्मी अपार्ट पर्यत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | रू. ६,२०,५००/- | मे. श्रीगजानन मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे. | अंदाजपत्रकिय दराने |
| ७ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २३ येथे जे.पी. नगर "ई" अपार्ट ते चाचा भतीजा अपार्ट | रु.६,४१,७००/- | मे. शितलादेवी मजुर कामगार सहकारी संस्था | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पर्यंत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे. | | मर्या.<br>ता. शहापूर, जि. ठाणे. | |
| ८ | भाईंदर (पूर्व) खारीगाव शाळागृह इमारत येथील हॉलवरील पहील्या मजल्यावर नाईट शेल्टर करीता बांधकाम करणे. | रु.९,४१,७५०/- | मे. गावदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. | अंदाजपत्रकिय दराने |
| ९ | भाईंदर (पूर्व) विमल डेअरी रस्त्यापासून रत्नसिंधू इमारतीपर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु.७,२२,६००/- | मे. गावदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. | अंदाजपत्रकिय दराने |
| १० | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरूस्ती करणे. | रू. ९,७३,०९७/- | मे. न्यू फिल्ड | अंदाजपत्रकिय दराने |

वरील कामास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची 'ड' मधील प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये केलेल्या कार्यवाहीस अवलोकन करून मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ - सकाळी ११.३० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

56 Maha 2011

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २२/१२/२०११

## // गोषवारा //

विषय - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी सि.आर.झेड. नकाशे तयार करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रकरण क्र. ९८

मिरा भाईंदर शहरात ग्रामपंचायत काळापासून सुमारे १९७० सालापासून इमारती बांधलेल्या आहेत. सि.आर.झेड. कायदा १९९१ साली अस्तित्वात आला, पण त्याची अंमलबजावणी सन २००० नंतर झाली.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा "कोस्टल झोन मॅनेजमेंट नकाशा" (CZMP) शासनाकडून पत्र क्र. टिपीएस - २००४/मिरा-भाईंदर/युडी-१२, दि.३०/०६/२००५ अन्वये प्राप्त झालेला आहे. या नकाशानुसार भाईंदर (प.), भाईंदर (पु.), मिरा रोड (पु.), घोडबंदर, इ. विकसीत क्षेत्र ही CRZ-III ने बाधीत होत आहे. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिकेने शासनाकडे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/ ३३९१/२०१०-११, दि.१८/१२/२०१० अन्वये सि.आर.झेड. नकाशाचे वर्गीकरणात बदल करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. तद्नंतर केंद्र शासनाचे सि.आर.झेड. बाबत अधिसूचना दि.०६/०१/२०११ रोजी प्रसिध्द झालेली आहे. या अधिसूचनेनुसार सि.आर.झेड. नकाशे तयार करणेबाबत निर्देश आहेत. याबाबत एम.सी.झेड.एम. ने दि.०८/०३/२०११ चे पत्रान्वये सि.आर.झेड. नकाशे तयार करणेबाबत महानगरपालिकेस कळविले आहे.

सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने शहराकरिता Cadastral Map बनविण्याकरिता मा. संचालक, "सेंटर फॉर अर्थ सायन्स स्टडिज" (CESS) या संस्थेस नियुक्त करणेबाबत पत्र क्र. मनपा/नर/१२०४/२०११-१२, दि.११/०७/२०११ अन्वये कळविलेले आहे व पत्र क्र. मनपा/नर/१८७९/२०११-१२, दि.१६/०९/२०११ अन्वये उपरोक्त प्रकरणात स्मरणपत्र दिलेले आहे.

सदर प्रकरणात सेंटर फॉर अर्थ सायन्स स्टडिज (CESS) यांनी दि.२७/०९/२०११ रोजीच्या पत्रान्वये शहराकरिता Cadestral Map बनविणेकरिता लागणारा खर्च रु.५०,०००/- प्रती कि.मी. तसेच सर्वेक्षण व सि.आर.झेड. नकाशे (HTL सह) तयार करणेसाठीचा दर मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सादर केलेले आहेत.

केंद्र शासनाचे दि.०६/०१/२०११ चे अधिसूचनेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रासाठी सि.आर.झेड. नकाशांचे फेरवर्गीकरणाची कार्यवाही २४ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे.

सध्याचे अस्तित्वात असलेल्या सि.आर.झेड. नकाशानुसार (HTL) रेषेची लांबी काढली असता, ती ७० कि.मी. येत आहे. यानुसार या कामासाठी सुमारे ३५ लाख खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी मंजूरी मिळणेबाबत मा. स्थायी समिती सभेस शिफारस असे.

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त दि. ५/१२/११
सायं. ५.३० वा.
५/१२/११

गोषवारा नोंद रजिस्टर
अ. क्र. ०१

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि. २२/१२/२०११.**

## गोषवारा

**प्रकरण क्र. ९९ :- निविदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

दि.०४/१०/२०११ रोजीच्या दै. फ्रि प्रेस जनरल व दै पुढारी या वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयांकीत निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदा दिनांक १९/१०/२०११ रोजी उघडण्यात आल्या. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**सी. आय. (एस. ॲन्ड एस.) टायटन पाईप्स (LA-Class) आय. एस. नं १५३६:२००१ आणि समकक्ष ISO/B.S स्टॅंडर्डप्रमाणे १०० मीमी ते ५०० मीमी व्यासाचे पुरवठा करणे.**

| व्यास | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. निविदेचा दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) | मे. नोबेल एंटरप्राईजेस निविदेचा दर (रू.) |
|---|---|---|---|
| १०० मि.मी | १२११.७० | ११७६.०० | १२१८.०० |
| १५० मि.मी | १९४२.५० | १८८५.०० | १९८२.०० |
| २०० मि.मी | २८४०.२५ | २७६०.०० | २८९७.०० |
| २५० मि.मि | ३८२७.२५ | ३९५०.०० | ३९०५.०० |
| ३०० मि.मि | ४९३५.०० | ५०९५.०० | ५०३४.०० |
| ३५० मि.मि | ६२११.२५ | ७८४४.०० | ६३४२.०० |
| ४०० मि.मि | ७५७०.५० | ९५४७.०० | ७७१८.०० |
| ४५० मि.मि | ९१३५.०० | ११५०८.०० | ९३०६.०० |
| ५०० मि.मि | १०७१०.०० | १३४७४.०० | १०८९८.०० |

वरील कामासाठी स्पर्धात्मक निविदा दर मागविण्यात आले होते. प्राप्त निविदेनुसार केशरी ॲन्ड कंपनीचे १००,१५०,२०० मि.मी. व्यासाकरीता व अे.ई. इन्फ्राप्रोजेक्टचे २५० ते ५०० मि.मी. व्यासाकरीता दर लघुत्तम आहेत. सदर बाबत केशरी ॲन्ड कंपनीचे १००,१५०,२०० मि.मी. व्यासाकरीता दर कमी करण्यास नकार दिलेला आहे. व अे.ई. इन्फ्राप्रोजेक्टचे २५० ते ५०० मि.मी. व्यासाकरीता दर वाटाघाटीकरीता ४ टक्के कमी करण्यास पत्र देऊन कळविले आहे. त्याप्रमाणे खालीलप्रमाणे दरसुची होत आहे.

| व्यास | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट लि. निविदेचा दर (रू.) | मे. अे.ई. इन्फ्राप्रोजेक्ट लि. वाटाघाटीअंती दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी वाटाघाटीअंती दर (रू.) |
|---|---|---|---|---|
| १०० मि.मी | -- | -- | ११७६.०० | ११७६.०० |
| १५० मि.मी | -- | -- | १८८५.०० | १८८५.०० |
| २०० मि.मी | -- | -- | २७६०.०० | २७६०.०० |
| २५० मि.मि | ३८२७.२५ | ३६७४.१६ | -- | -- |
| ३०० मि.मि | ४९३५.०० | ४७३७.६० | -- | -- |
| ३५० मि.मि | ६२११.२५ | ५९६२.८० | -- | -- |
| ४०० मि.मि | ७५७०.५० | ७२६७.६८ | -- | -- |
| ४५० मि.मि | ९१३५.०० | ८७६९.६० | -- | -- |
| ५०० मि.मि | १०७१०.०० | १०२८१.६० | -- | -- |

सदर निविदेचा वाटाघाटीनंतरचे दर वरील प्रमाणे आलेले आहेत. तरी सदर दर हे वाजवी व रास्त असल्याने मान्यता देणेस शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

*मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने*

छाप मि. ७५।१२।१७
बेलुका ८. ३ ५.३०

७५।१२।१८

(७)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २२/१२/२०११

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. (१००) :- मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे.
(पाणी पुरवठा विभाग)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यानी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|---|
| १. | चवळी पंपिंग स्टेशन ते धावगी डोंगरपर्यंत (लाल बहादूर शास्त्री नगर) येथे जलवाहिनी अंथरणे | रू.८,७०,९२३/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| २. | उत्तन जलकुंभ ते पाली पेट्रोलपंपपर्यंत बिडाची वितरण जलवाहिनी अंथरणे | रू.९,३०,६००/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| ३. | भाईंदर (पुर्व) गोडदेव जलकुंभाच्या आवारात पोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.१३,५०,३५३/- | मे. आर. जी. कन्स्ट्रक्शन |
| ४. | मिरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील साईव्दार बिल्डींग ते तुळशीप्रसाद इमारतपर्यंत जुनी सिमेंटची जलवाहिनी बदलून नवीन बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.५,७०,२९९/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| ५. | मिरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील न्यु कृष्णा कॉम्प्लेक्स ते ओमकार येथे बिडाची जलवाहिनी अंथरणे | रू.६,६१,९०५/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| ६. | कनाकिया ते हटकेश परिसरामध्ये जलवाहिनी अंथरणेसाठी खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करणे | रू.९,६६,६२१/- | शिवपुत्र मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ७. | शांती पार्क व शीतल नगर परिसरामध्ये जलवाहिनी अंथरणेसाठी खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करणे. | रू.९,८८,५१८/- | श्री गंगा मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ८. | मिरारोड (पुर्व) शांती पार्क येथील विजय पार्क रस्ता ते जांगिड इस्टेटपर्यंत बिडाची जलवाहिनी अंथरणे. | रू.७,०१,३५९/- | गोपाळकृष्ण मजूर कामगार सह. संस्था मर्या. |
| ९. | मिरारोड (पुर्व) शांती पार्क येथे हॅपी होम कॉम्प्लेक्स समोरील रस्त्यावर बिडाची जलवाहनी पुरविणे व अंथरणे | रू.६,११,७२३/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| १०. | भाईंदर (पुर्व) येथील फाटक जलकुंभ किंवा महानगरपालिका सुचवेल तो इतर जलकुंभ येथून मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे | रू.३८०/- प्रति फेरा | मे. सागर वॉटर सप्लाय |
| ११. | भाईंदर (पुर्व) गोल्डन नेस्ट येथील सोनम सागर पासून सोनम ज्योत पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.९,२३,१३१/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| १२. | मिरारोड (पुर्व) आयप्पा मंदिर ते संस्कृती टॉवर नं. २ येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.७,८४,२७३/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| १३. | मिरारोड (पुर्व) गिता नगर येथील मुख्य रस्त्यावर जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रू.९,७५,९०१/- | गणेश डेव्हेलोपर्स |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | भाईंदर (पुर्व) हटकेश शांती विद्या नगरी येथे बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे | रु.१२,३१,२२८/- | मानस कन्स्ट्रक्शन |
| १५. | डोंगरी येथे नविन पंपिंग स्टेशनचे बांधकाम करणे | रु.१५,०१,४७०/- | गणेश डेव्हेलोपर्स |
| १६. | नवघर जलकुंभ येथे संरक्षक भिंत बांधणे | रु.१२,४९,९२३/- | श्री दत्तप्रसाद मजूर कामगार सह. संस्था मर्या. |

सबब उपरोक्त प्रस्तावांचे अवलोकन करणेस मा. स्थायी समितीस विनंती आहे.

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

प्राप्त दि. १५/१२/१७
वेळ स. ११.३०

१५/१२/१७

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २२/१२/२०११.

## // गोषवारा //

प्रकरण क्र :- ( १०७ ) मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामाचे अवलोकन करणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांस मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च | लेखाशिर्ष | मा.आयुक्त निविदा मंजूरी दिनांक | ठेकेदाराचे नांव / कामाचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | रा.म.क्र. ८ मुन्शी कंम्पाउंड येथील शकुन चिकन ते पाण्याची टाकी पर्यंत रस्ता उंच करून डांबरीकरण करणे (नगरसेवक निधी) | रू ९,९८,५००/- | नगरसेवक निधी | दि.२४/११/११ | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं. अंदाजपत्रकिय दराने |
| २ | भाईंदर (पूर्व) नवघर फाटक रोड वरील महेश स्टुडियो ते सुंदर भवन इमारती पर्यंत नाला बांधून स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी ) | रू.९,९९,३००/- | नगरसेवक निधी | दि.१४/११/११ | मे. विराज कंन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकिय दराने |
| ३ | मिरारोड (पूर्व) कुणाल शॉपिंग सेंटर समोर क्रॉस ड्रेन बांधणे. (नगरसेवक निधी ) | रू.११,८९,८६०/- | नगरसेवक निधी / गटारे बांधकाम | दि.०५/११/११ | मे. मुस्कान इंटरप्रायजेस अंदाजपत्रकिय दराने |
| ४ | भाईंदर (प) प्रभाग क्र. २ मधील सागर बेकरी ते राजेश टी स्टॉल पर्यंत असलेल्या गटारावर स्लॅब टाकणे. | रू. ९,९८,८००/- | नगरसेवक निधी | दि.०५/११/११ | मे. श्रृती इंटरप्रायजेस अंदाजपत्रकिय दराने |
| ५ | भाईंदर (पूर्व) सोनल पार्क ते सुप्रिया पार्क पर्यंत गटार बांधून स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९९,८५०/- | नगरसेवक निधी | दि.७/१२/११ | मे. राठोड ब्रदर्स ०.१ % कमी दराने |
| ६ | भाईंदर (पूर्व) रामदेव पार्क येथील वागड नगर येथील लिबर्टी कॉर्नर ते साई करिष्मा इमारतीपर्यंत गटार बांधणे व रस्ता बनविणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९८,४००/- | नगरसेवक निधी | दि.७/१२/११ | मे. विराज कंन्स्ट्रक्शन अंदाजपत्रकिय दराने |
| ७ | मिरारोड (पूर्व) ऐव्हरशाईन नगर रस्त्यावरील धरती कॉम्पलेक्स बि विंग ते सत्यम इमारती पर्यंत नविन गटार बांधणे व स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रू. ९,९५,५५०/- | नगरसेवक निधी | दि.७/१२/११ | मे. मुस्कान इंटरप्रायजेस अंदाजपत्रकिय दराने |
| ८ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध जंक्शनवरील सिग्नल यंत्रणा व ब्लींकर वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.१२,०९,९७०/- | सिग्नल यंत्रणा | दि.२१/११/११ | मे. युटीलीटी इंटरप्रायजेस कोटेशन दराने |

वरील कामे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग

**मा. आयुक्त यांच्या मंजूरीने**

DKV/DK/SG/ 2011-12-35

सदर गोषवारा वर्ग केला (५/१२/११)

प्राप्त दि. १२/१२/२०११

वेळ - १-१५

रजिस्टर क्रं. १० वर नोंद

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग
## मा. स्थायी समिती सभा दि.२२/१२/२०११.
// के अन्वये प्रस्ताव//
## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र.१०२ आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत शहरास ३० द.ल.लि. पाणी पुरवठा केला जातो. सदर पाणी पंपिंग करण्यासाठी कापूरबावडी येथे मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत पंपगृह बांधलेले आहे. या पंपगृहात ३० द.ल.लि. पाणी शहरासाठी पंपिंग केले जाते. सदर पंप चालविणेसाठी प्रशिक्षित तांत्रिक कर्मचाऱ्यांची दिवस रात्र पाळीमध्ये आवश्यकता आहे व सदर पंपिंग स्टेशनच्या देखभाल दुरूस्तीचे काम व्यवस्थितरित्या करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ३० द.ल.लि. पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापूरबावडी) येथील पंपिंग स्टेशनच्या वार्षिक देखभाल, दुरूस्ती व चालविणे. | रू.४२,९३,३००/- |

तरी उपरोक्त कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

प्राप्त दि. २०।१२।११
[signature] क्लर्क स.११.२५
२०।१२।११

स्थायी समिति गोषवारा
नोंद रजिस्टर अ.क्र. १४.